सकाळ

# राजुरीतील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे

**आळेफाटा, ता. १ :** राजुरी (ता. जुन्नर) येथील जनता विकास मंडळ संचलित विद्या विकास मंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात बी. जे. महाविद्यालय, आळे आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्या वतीने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत सायबर जागृती सत्र घेण्यात आले.

या सत्रात बी. जे. महाविद्यालयाच्या वॉरिअर्सने विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फेक लिंक्स, ओटीपी स्कॅम, पासवर्डचे रक्षण आणि वैयक्तिक माहितीची गोपनीयता यावर उदाहरणांसह माहिती देण्यात आली. मुख्याध्यापक जी. के. औटी यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत उपक्रमाचे कौतुक केले व अशा प्रकारच्या कार्यक्रमांनी सायबर सुरक्षितेबाबत जनजागृती नक्की होईल, असं मत व्यक्त केलं. याप्रसंगी बी. जे. महाविद्यालय राबवत असलेल्या या उपक्रमाबाबत प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव, बीसीए-बीसीएस विभाग प्रमुख नूतन जोशी व सर्व सायबर वॉरिअर्सचे अभिनंदन केले. या कार्यक्रमासाठी सायबर वॉरिअर्स साक्षी नेहरकर, ऋतू नेहरकर, दीक्षा सस्ते, आकांक्षा कोकाटे, हवलदार फरीन, पटेल बुशरा, समृद्धी टाकळकर व वैष्णवी तांबे या विद्यार्थिनींनी मेहनत घेतली. यावेळी सुनील पवार आदी उपस्थित होते.

Pune, District-Today
02/08/2025 Page No. 7